सिटी ॲक्टिव्हिटी
सोलापूर, रविवार, २६ जुलै २०१५

**वसुंधरा महोत्सव** | पर्यावरण संवर्धन व जागृतीबाबत उपाययोजनांचे सादरीकरण

# महाविद्यालयांचा परिसर ग्रीन अन् क्लीन ठेवण्याचा निर्धार

## शून्य कचरा व पर्यावरण जागृतीबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी | सोलापूर

महाविद्यालय परिसर पर्यावरणपूरक ठेवण्याबरोबर वीज व पाणी बचत, कचरा व्यवस्थापनाला विशेष प्राधान्य देण्यात येत असल्याचे महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सादरीकरणातून दाखवले. प्रदूषणमुक्त, ग्रीन व क्लीन कॅम्पस ठेवण्याचा निर्धार तरुणांनी केला.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवनिमित्त शनिवारी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'ग्रीन व क्लीन कॉलेज कॅम्पस' उपक्रम आयोजिला होता. मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटमध्ये पर्यावरण अभ्यासक डॉ. आनंद कर्वे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. किर्लोस्कर कंपनीचे व्यवस्थापक डॉ. एस. पी. वैद्य, मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रमोद वैद्य, महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव, प्रा. नरेंद्र काटीकर, ऋषिकेश कुलकर्णी, बाबूराव पेठकर, दैदीप्य वडापूरकर उपस्थित होते.

वालचंद इन्स्टिट्यूट, बीएमआयटी, ए. जी. पाटील, व्हीव्हीपीसह १२ महाविद्यालयांनी व्यवस्थापनाने पर्यावरण संवर्धन व जागृतीबाबत उपाययोजनांचे सादरीकरण केले.

डॉ. कर्वे म्हणाले, "कचरा जाळल्याने होणाऱ्या धुरातील सूक्ष्मकण माणसांच्या फुफ्फुसांतून रक्तात प्रवेश करतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीकमी होते. झाड, पिकांना प्रामुख्याने रासायनिक खतांची गरजच नसते. पण, पाश्चात्य कंपन्यांकडून सर्वसामान्यांची दिशाभूल करून त्यांचे उत्पादन शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या माथी मारण्यात येते.''

कार्यक्रम यशस्वितेसाठी एस. एस. जाधव, वर्षा गोटे, कपिल बायस, यू . एस . आलुरे, राकेश तुळे, रमेश वागज, निखिल थोरात आदींनी परिश्रम घेतले. त्यानंतर मॉडर्न हायस्कूलमध्ये पर्यावरण विषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. त्याचे उद्घाटन संस्थेचे सचिव ए. के. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.


मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रमोद वैद्य यांनी वसुंधरा महोत्सवांतर्गत विविध शाळांतील मुलांना पर्यावरणाविषयी माहिती दिली.

## पर्यावरणीय खेळांत रमले विद्यार्थी

वसुंधरा महोत्सवनिमित्त विविध शाळांत पर्यावरणीय खेळ व संदेश देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन केले होते. ज्ञान प्रबोधिनी शाळेतील सभागृहात महोत्सव प्रमुख वीरेंद्र चित्राव यांनी पर्यावरणविषयी मुलांना माहिती दिली. पर्यावरणविषयी प्रश्न विचारून त्यांच्याकडून माहिती घेतली. या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनविषयक लघुपट दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.



पुरस्कार वितरण प्रसंगी किर्लोस्कर कंपनीचे एस. एस. कुलकर्णी, एस. आर. देसाई, एस. एस. गायकवाड, वीरेंद चित्राव व पुरस्कार प्राप्त.

## वसुंधरा मित्र पुरस्कारांचे उत्साहात वितरण

**सोलापूर.** डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात शुक्रवारी आयोजित वसुंधरा मित्र पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठवर किर्लोस्कर कंपनीचे एस. एस. कुलकर्णी, एस. आर. देसाई, एस. एस. गायकवाड, वसुंधरा महोत्सवचे संचालक वीरेंद चित्राव उपस्थित होते. प्रथम सँड आर्टच्या निमित्ताने पर्यावरण बचावाचा संदेश देण्यात आला.अर्पित नृत्यालयाच्या वतीने मनिषा जोशी व शिष्या यांनी शास्त्रीय नृत्याच्या माध्यमाने कचरा नियोजनाचा उत्तम संदेश दिला. यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना एस. एस. गायकवाड यांनी केली. पुरस्कार मानपत्राचे वाचन आसावरी नारकर यांनी केले. निर्सगाशी नाते सांगणारी पत्रकारिता करणाऱ्या रजनीश जोशी, तर सरकारी अधिकारी म्हणून काम करत असताना विकासाभिमुख काम करणारे अशोक पाटील तर वेगळया धाटणीच्या घराची निर्मिती करणाऱ्या विनय नारकर, श्रुताली नारकर यांचा डॉ. आनंद कर्वे यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ असे होते.